# अर्थसंकल्पात एसटीची झोळी रिकामीच

## एसटी कर्मचारी काँग्रेसचा आरोप

### एसटीला दररोज लागते १२ लाख लिटर डिझेल

एसटीकडे सध्या १५४०० गाड्या असून दररोज १२ लाख लिटर डिझेल लागते. त्यावर प्रति वर्षी साधारण ३४०० ते ३५०० कोटी रुपये इतकी रक्कम खर्च होते. एसटीची रचना "ना नफा ना तोटा" व "प्रवाशांच्या सेवेसाठी" या तत्त्वावर आधारित असून मुळात एसटीला कुठलीच कर आकारणी नसावी, अशी मागणी बरगे यांनी केली आहे.

**मुंबई** : गेली ७६ वर्षे नित्य नियमाने वारकऱ्यांना पांडुरंगाचे दर्शन घडविणारी एसटी आषाढीवारी अगोदर निधीच्या तरतुदीपासून उपेक्षित राहिली असल्याचा आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे. त्याचप्रमाणे विकासकामांसाठी व नवीन गाड्या घेण्यासाठी अर्थसंकल्पात एक पैशाचीही मदत केली नसल्याची खंत संघटनेने व्यक्त केली आहे.

राज्याच्या अर्थ संकल्पात पेट्रोल व डिझेलवरील मूल्यवर्धित कर राज्यभरात समान करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील डिझेलवरील सध्याचा कर २४ टक्क्यांवरून २१ टक्के प्रस्तावित करण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळणार आहे. या बदलामुळे ठाणे, बृहन्मुंबई आणि नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील डिझेलचा दर अंदाजे दोन रुपये साठ पैसे प्रति लिटर कमी होणार आहे.

### गेल्या अर्थसंकल्पात तरतूद केलेला निधी मिळाला नाही

गेल्या अर्थसंकल्पात स्थानक नूतनीकरण, एल.एन.जी.मध्ये गाड्या परावर्तित करणे, त्याचप्रमाणे इलेक्ट्रिक वाहनांना चार्जिंग सेंटर उभारण्यासाठी व इतर बाबींसाठी एसटीला साधारण २२०० कोटी रुपयांची रक्कम तरतूद करण्यात आली होती. त्यातील केवळ ३९० कोटी रुपये इतकी रक्कम एसटीला सरकारने दिली आहे.



मात्र डिझेलचा सर्वात मोठा ग्राहक असलेल्या एसटीला त्याचा काहीही फायदा मिळणार नाही. कारण एसटीच्या बहुतांश गाड्यांना ग्रामीण भागात डिझेल भरले जाते, असे बरगे यांनी नमूद केले आहे.

मुंबई शहरात जादा कर आकारणी होत असल्याने एसटीने काही वर्षांपूर्वी मुंबईत डिझेल भरणे बंद केले असून नवी मुंबईत एसटीचा एकही डिझेल पंप नाही. मुंबई शहरातील मुंबई सेंट्रल व कुर्ला नेहरूनगर येथील दोन्ही डिझेल पंप बंद असून मुंबई-पुणे विना थांबा सेवा सुरू असल्याने फक्त परळ आगारात डिझेल पंप सुरू आहे. नव्या निर्णयामुळे बंद करण्यात आलेले दोन पंप पुन्हा सुरू होतील. मात्र एसटीच्या बहुतांशी गाड्यांना ग्रामीण भागात डिझेल भरले जात आहे. त्यामुळे राज्यातील सर्वात मोठा डिझेलचा ग्राहक असलेल्या एसटीला डिझेलवरील करात सूट देण्यात आली पाहिजे, अशी मागणी बरगे यांनी केली आहे.

# शेतकरी भूमिहीन होण्याचा धोका!

## शक्तिपीठ महामार्ग प्रकल्प रद्द करण्याची विरोधकांची मागणी

**मुंबई** : सिंधुदुर्ग ते वर्ध्यापर्यंत शक्तीपीठ महामार्ग प्रकल्प प्रस्तावित आहे. मात्र या प्रकल्पामुळे शेतकरी भूमिहीन होण्याचा धोका आहे. त्यामुळे हा प्रकल्प स्थगित न करता संपूर्ण रद्द करण्यात यावा, अशी मागणी शनिवारी विधान परिषदेत विरोधकांनी लावून धरली. शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पांसाठी कुठलीही जमीन संपादीत केलेली नाही, त्यामुळे प्रकल्प रद्द करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे उत्तर मंत्री दादा भुसे यांनी दिले. रस्ते अपघात हे समृद्ध महामार्गावर होतात असे नाही तर खेडेगावातील रस्त्यावर अपघातांचे सत्र सुरू असते, असे विधान भुसे यांनी करतात विरोधकांनी भुसे विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. विरोधकांच्या मागणीवर सार्वजनिक बांधकाम (उपक्रम वगळून) मंत्र्यांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने प्रकल्प रद्द करा जोरदार घोषणाबाजी वेलमध्ये केली. विरोधकांच्या गोंधळामुळे उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी अखेर परिषदेचे कामकाज १० मिनिटं तहकूब केले.

राज्यात सिंधुदुर्ग ते वर्ध्यातील दिग्रस पर्यंत ८०५ किलोमीटर लांबीचा शक्तिपीठ महामार्ग बांधण्याचे प्रस्तावित आहे. ८६ हजार कोटी रुपये यावर खर्च केले जाणार आहे. १२ जिल्ह्यांतील २७ हजार ५०० एकर जमी संपादित केली जाणार आहे. १७ देवस्थान जोडण्याचा हा प्रयत्न आहे. मात्र, हा महामार्ग कंत्राटदारांचे खिसे भरण्यासाठी बांधत आहेत का, असा संतप्त सवाल विचारला. २० दिवसांत अधिकाऱ्यांनी महामार्गाची घोषणा केली. इतकी घाई कशासाठी, रस्त्याचे कंत्राट नक्की कोणाला द्यायचा आहे. एक मार्ग असताना, नवीन महामार्गाची गरज काय अशा प्रश्नांची सरबत्ती केली. आजवर कोणत्याही रस्त्याला कोल्हापूर वासियांनी विरोध केला नाही. मात्र, पहिल्याच शक्तिपीठ महामार्गाला विरोध होऊ लागल्याची बाब निदर्शनास आणून दिली. तसेच रस्त्याचे काम करणारा कोण, हे जाहीर करावे असे सांगत ८६ हजार कोटी पैकी ५ कोटी या रस्त्याला द्यावे, अशी जोरदार मागणी सतेज पाटील यांनी केली.

### प्रकल्प रद्द करण्याचा प्रश्नच नाही - दादा भुसे

महामार्गाबाबत आलेल्या निवेदनानुसार प्रकल्पात बदल केले होते. स्थानिक पातळीवर सर्वांशी चर्चा करून हा प्रकल्प पुढे सुरू केला, असे स्पष्टीकरण मंत्री दादा भुसे यांनी दिले. आमदार शशिकांत शिंदे यांनी उत्तरावर आक्षेप घेतला. कोल्हापूर हा सुपीक जिल्हा आहे. अनेक प्रकल्पांसाठी कोल्हापूरकरांनी त्यांच्या जमिनी दिल्या आहेत. सध्या शक्तिपीठाला पर्यायी मार्ग असताना ही प्रकल्प रेटण्याचे काम सुरू आहे. शेतकऱ्यांचा भूसंपादनाला यामुळे विरोध आहे. त्यामुळे तातडीने प्रकल्प रद्द करण्याची घोषणा करावी, अशी मागणी लावून धरली. शिंदेंच्या प्रश्नावर भुसे यांनी संताप व्यक्त केला. भूसंपादनाचा पुढचा विषय आहे. समृध्दी सारखा नावलौकीक महामार्ग राज्यात झाला आहे. राज्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून हे महामार्ग खूप महत्त्वाचे आहेत. समृद्धी महामार्गावरच अपघात होतात असे नव्हे तर खेडेगावातील रस्त्यांवरही होतात. अपघात होऊच नये अशी आपली भावना आहे. मात्र, महामार्गाच्या भूसंपादनची प्रक्रिया सुरु झालेली नाही. त्यामुळे प्रकल्प रेटण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही, असे उत्तर भुसे यांनी दिले. भुसे यांच्या विधानानंतर विरोधक चांगलेच आक्रमक झाले आणि सभागृहात गदारोळ घातला.

# नव्या अर्थसंकल्पात ढोंगीपणाची कमाल

## शरद जावडेकर यांची टीका

**मुंबई** : राज्याच्या अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांनी मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याची घोषणा केली आहे. राज्यातील व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण वाढवण्यासाठी अभियांत्रिकी, औषध निर्माण इत्यादी पदवी-पदविका अभ्यासक्रमासाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये शंभर टक्के प्रतिपूर्ती करण्यात येईल. याचा फायदा २ लाख ५ हजार मुलींना होणार आहे, दरवर्षात रुपये दोन हजार कोटींचा भार शासनावर पडणार आहे, असे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले असले तरी ही घोषणा ऐकताना हसावे की रडावे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, अशी टीका अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्कसभेचे कार्याध्यक्ष शरद जावडेकर यांनी केली आहे.

जावडेकर म्हणाले की, "शिक्षण हक्क कायद्यानुसार विनाअनुदानित शाळेत २५ टक्के आरक्षण आर्थिक व सामाजिक दुर्बल घटकाला आहे. या २५ टक्के विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिकृती शासनाने शाळांना करावी, असे कायदेशीर बंधन आहे. महाराष्ट्र शासनाने ९ फेब्रुवारी २०२४ रोजी अधिसूचना काढून प्रवेश नियमातच बदल करत कायद्याने सामाजिक व आर्थिक दुर्बल घटकातील मुलांना खासगी विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षणाचा हक्क दिला होता, तो काढून घेतला आहे. त्यासाठी पालकांना जनहित याचिकेद्वारे उच्च न्यायालयात दाद मागावी लागली आहे. शिक्षण हक्क कायद्याची शुल्क प्रतिपूर्तीची जबाबदारी नको म्हणून महाराष्ट्रात सरकारने सुमारे एक लाख पालकांना तणावाखाली ठेवले आहे व दुसरीकडे मुलींच्या मोफत उच्च शिक्षणाची व शुल्क प्रतिपूर्तीची योजना निवडणुका नजरेसमोर ठेवून जाहीर केली आहे." "जर हे सरकार परत निवडून आले तर पैसे वाचवण्यासाठी मुलींच्या मोफत उच्च शिक्षणाची योजना बंद केली जाईल व आज शिक्षण हक्क कायद्याच्या २५ टक्के आरक्षणातील मुलांचे व पालकांचे जे हाल सरकार करत आहे, तीच परिस्थिती या योजनेतून उच्च शिक्षणात गेलेल्या मुलींचे व त्यांच्या पालकांचे होणार आहेत. मोफत शिक्षणाच्या संदर्भात राज्य सरकारची कृती व नियत प्रामाणिक नाही, असेच म्हणावे लागेल. त्यामुळे जनता विसरभोळी असते, असे सत्ताधाऱ्यांनी मानू नये," असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# महिलांनी मुख्यमंत्र्यांना बांधली राखी

## राज्याच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद

**मुंबई** : राज्याच्या अर्थसंकल्पात महिला भगिनींसाठी अनेक निर्णय घेऊन त्यांना दिलासा दिल्याबद्दल विविध क्षेत्रातील महिला भगिनींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ओवाळून राखी बांधत त्यांचे आभार मानले, तर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी १ जुलैपासून करत असल्याचे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांना अनोखी ओवाळणी दिली.

विधानभवनाच्या प्रांगणात शनिवारी विविध क्षेत्रातील महिला भगिनी एकत्र जमल्या होत्या. विधिमंडळात शुक्रवारी सादर झालेल्या अर्थसंकल्पात महिलांसाठी अनेक निर्णय घेण्यात आले. या निर्णयामुळे राज्यतील महिलांना मोठा दिलासा मिळाल्याने त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ओवाळून राखी बांधून घेतलेल्या या निर्णयांबद्दल त्यांचे आभार मानले.

अर्थसंकल्पात राज्यातील महिला भगिनींना दिलासा देणारे अनेक निर्णय आम्ही घेतले आहेत. आम्ही



घेतलेल्या मुख्यमंत्री माझी बहिण योजनेचा जीआर देखील तातडीने काढण्याचा निर्णय आम्ही घेतला असून त्याचे लाभ येत्या १ जुलैपासून माता भगिनींना देण्यात येणार आहे. यानुसार या महिलांना दरमहा पंधराशे रुपये महिलांना मिळणार आहेत. या निर्णयाचा फायदा अडीच कोटींहून जास्त महिलांना होणार आहे. त्यासोबत महिलांना वर्षातून ३ सिलिंडर मोफत देणाऱ्या मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनाही लवकरच सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. २५ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. बचतगटांतील महिलांचे खेळते भांडवल १५ हजारावरून वाढवून ३० हजार केले आहे. मुलींना उच्च शिक्षणापर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. १० हजार महिलाना पिंक रिक्षांचे वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच महिलांना मोफत प्रवास, ५० टक्क्यांपर्यंत मोफत एसटी प्रवास यापूर्वीच दिलेला आहे. या सर्व निर्णयाबद्दल या महिलांनी माझे आभार मानून मला राखी बांधल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी शासनाचे आभार मानले. यावेळी मंत्री दादाजी भुसे, आमदार प्रताप सरनाईक, आमदार नरेंद्र भोंडेकर आणि विविध क्षेत्रातील महिला भगिनी आवर्जून उपस्थित होत्या.

# होर्डिंग्ज दुर्घटनेचे परिषदेत पडसाद

## मुंबईसह राज्यातील होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट | ३० दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश

**मुंबई** : घाटकोपर छेडानगर येथील होर्डिंग्ज दुर्घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुंबईसह राज्यातील होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. पुढील ३० दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर होर्डिंग्ज धोरण निश्चित करण्यात येईल, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी विधान परिषदेत दिली. आमदार सुनील शिंदे यांनी शनिवारी विधान परिषदेत लक्षवेधी सूचना उपस्थित केली, त्यावर सामंत यांनी उत्तर दिले.

१३ मे रोजी मुंबईत वादळीवाऱ्यासह जोरदार बरसलेल्या पावसामुळे घाटकोपर छेडानगर येथे १२० बाय १२० फुटांचे महाकाय होर्डिंग जवळील पेट्रोल पंपावर कोसळले. या दुर्घटनेत १७ निष्पाप लोकांचा बळी गेला आणि ८१ जण जखमी झाले. तर ६० हून अधिक चारचाकी व दुचाकी वाहनांचे नुकसान झाले. या घटनेनंतर मुंबईच्या रस्त्यांवरील १,०१५ आणि मध्य व पश्चिम रेल्वेच्या हद्दीत ३०६ होर्डिंग्ज असल्याचे निदर्शनास आले. ३०६ पैकी ९९ बेकायदा होर्डिंग्ज मध्य व पश्चिम रेल्वेच्या हद्दीत असल्याने पालिका प्रशासनाने डिजास्टर ॲक्टअंतर्गत संबंधित कंपनीला नोटीस बजावली. मात्र नोटीस बजावूनही कंपनीने दुर्लक्ष केले, होर्डिंग लावण्यासाठी पालिकेची रितसर परवानगी घेतलेली नाही. त्यातच राज्य सरकारने मृत व जखमींच्या कुटुंबीयांना जाहीर केलेली मदत तुटपुंजी आहे. या गंभीर प्रश्नी राज्य सरकारने योग्य ती कार्यवाही करत निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार सतेज पाटील यांनी लक्षवेधीद्वारे केली.

दरम्यान, घाटकोपर होर्डिंग्ज दुर्घटनेनंतर राज्यातील होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच माजी न्यायाधीश दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. या समितीत होर्डिंग कायदा सुधारण्यासाठी तज्ज्ञ व काही सर्वपक्षीय आमदारांचा समावेश करण्यात येणार, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

# प्रलंबित सभापतीपदाची निवडणूक कधी घेणार?

## निवडणूक जाहीर करण्याची सदस्यांची मागणी

**मुंबई** : गेल्या अडीच वर्षांपासून विधान परिषदेच्या सभापतीची निवडणूक झालेली नाही. परिषदेच्या इतिहासात प्रथमच असा प्रकार घडला आहे. यामुळे सभागृहाची प्रतिमा मलीन होत आहे. त्यामुळे सभापतीपदाची रिक्त निवडणूक जाहीर करा, अशी मागणी विधान परिषदेच्या सदस्यांनी शनिवारी केली.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी विधान परिषदेचे कामकाज सुरू होताच, जयंत पाटील यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे सभापतींच्या रिक्त पदाचा मुद्दा उपस्थित केला. सभापतींची निवड कशी करायची, हे १८२ अन्वये ठरलेले आहे. असे असताना गेली अडीच वर्षे सभापतींचे पद रिक्त आहे. हे सभागृह घटनेप्रमाणे चालायला हवे. सभापतींच्या रिक्त जागेबाबत विधिमंडळ सचिवांनी राज्यपालांना कळवले आहे काय, असा सवाल जयंत पाटील यांनी केला.

### रिक्त पदासाठी जबाबदार कोण?

विधिमंडळाच्या कामकाजात विधान परिषदेचे जे नियम आहेत, त्यामध्ये सभापतींचे पद किती काळ रिक्त राहील, किती काळाच्या आत भरले जाईल, याची तरतूद नाही काय, असा सवाल करत तशी तरतूद असेल आणि ते पद भरले जात नसेल तर त्याला जबाबदार कोण याचा खुलासा करावा, अशी मागणी अभिजीत वंजारी यांनी केली.

### गटनेत्यांच्या बैठकीत निर्णय घ्यावा!

सभागृहात शनिवारी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संसदीय कामकाज मंत्री नाहीत. सर्व पक्षांनी एकत्रित निर्णय घेऊन सरकारकडे निवेदन द्यावे. या संदर्भात सोमवारी गटनेत्यांच्या बैठकीत निर्णय घ्यावा, असे उपसभापती म्हणाल्या.

# खेळाडूंना नोकरी देण्यासाठी निकष निश्चिती

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

**मुंबई** : राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे अनेक खेळाडू उत्तम कामगिरी करत आहे. महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविणाऱ्या या खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार सरकारी नोकरी देण्यासाठीचे निकष निश्चित करण्याबाबतचा निर्णय नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचाविणारा कोणताही खेळाडू या निर्णयाच्या लाभापासून वंचित राहू नये म्हणून आवश्यकता असल्यास निकषांमध्ये आणखी मुद्दे समाविष्ट करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंना शासकीय सेवेत सामावून घेतले जात नसल्याने मध्यंतरी राज्यातील खेळाडूंनी उपोषण करण्याचा इशारा दिला होता.

बँक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

झोनल स्ट्रेस्ड ॲसेट रिकव्हरी ब्रांच:
मेहेर चेंबर, तळ मजला, डॉ. सुंदरलाल बेहल मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१. दूरध्वनी : ०२२-४३६८३८०७,
ई-मेल : armbom@bankofbaroda.co.in

**जाहीर विक्री सूचना**

अंदाजे **१०००० कि ग्रॅ. वजनाच्या पॉलीव्हीनाईल ग्लीटर्स आणि नॉन-ग्लीटर्स शीटस** च्या विक्री साठी निविदा सूचना. राखीव किंमत : रू. २,२०,०००/-. विक्री **''जसे आहे जेथे आहे''** आणि **''जे काही आहे तेथे आहे''** तत्त्वाने होईल.

**कर्जदारांचे नाव : मे. रतन ग्लीटर इंडस्ट्रिज लिमिटेड**

आरएनए कॉर्पोरेट पार्क-ऑफ राम मंदिर रोड येथे पडून असलेल्या सुमारे १००००० कि.ग्रॅ. वजनाच्या पॉलीव्हीनाईल ग्लीटर्स आणि नॉन-ग्लीटर्स शीटसच्या विक्री साठी मोहोरबंद निविद मागवण्यांत येत आहेत. मत्तांचे निरीक्षण **२९.०७.२०२४** रोजी कामाच्या दिवशी स. १०.०० वा. दु. ३.०० वा. दरम्यान करता येईल. त्यासाठीच्या निविदांसोबत इअर म्हणून मुंबई येथे देय **''बँक ऑफ बडोदा एआरएमबी रिकव्हरी अकाऊंट मुंबई''** च्या नावातील रू. २२,०००/- साठीचा डिमांड ड्राफ्ट जोडावा, जे **३१.०७.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी सं. ५.०० वा.** पर्यंत आमच्या कार्यालयात पोहचणे आवश्यक आहे. इअर शिवाय पाठवलेल्या निविदा फेटाळल्या जातील. यशस्वी एच १ निविदाकार (सर्वोच्चा बोलीदार) यांना खात्रीशीरपणे ०७ दिवसांत संपूर्ण रक्कम जमा करावी लागेल. कोणतेही कारण न देता प्राप्त झालेले कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव फेटाळण्याचे अधिकार बँक राखून ठेवत आहे.

**दिनांक : २९/०६/२०२४**
**ठिकाण : मुंबई**

प्राधिकृत अधिकारी

